| MHAH230006522025 | **नियमित दिवाणी दावा क्र. ३२०/२०२५**<br>(पांडुरंग दादाराम औटी व इतर वि.<br>जिल्हाधिकारी व इतर) |
|---|---|

## निशाणी ४० खालील आदेश

**१.** अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.५ ते १० यांनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी हे धार्मिक कामानिमित्त परराज्यात गेले होते. त्यामुळे वकिलांशी संपर्क करता आला नाही तसेच कागदपत्रे व माहिती वेळेत देता आली नाही. त्यामुळे त्यांना वेळेत हजर राहता आले नाही व त्यांचेविरुध्द प्रकरण एकतर्फा चालविणेचा आदेश झालेला आहे. प्रतिवादींना त्यांचे म्हणणे देऊन बाजू मांडणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. सबब, त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येवून त्यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती त्यांनी केली.

**३.** प्रतिदाव्यातील वादींनी त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. वादी प्रतिवादी एकाच वाडीत राहतात. अर्जातील कारण खोटे, लबाडीचे, मोघम आहे. त्यास कागदोपत्री पुरावा नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. अथवा मंजूर केल्यास, रु.५०००/– कॉस्ट करण्यात यावी.

**४.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.५ ते १० यांना दि.१७/१२/२०२५ रोजी समन्सची बजावणी झाली परंतू ते प्रकरणात हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादी क्र.५ ते १० यांनी दि.२२/०१/२०२६ रोजी प्रकरणात हजर होवून प्रस्तुतचा अर्ज कैफीयतीसह दाखल केला. प्रस्तुत प्रतिदावा वादी यांनी जाहिर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला असल्यामुळे प्रतिवादी क्र.५ ते १० यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याउलट कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुद्यांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे कैफियत देण्यास झालेला विलंब खर्च बसवून माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.५ ते १० यांनी प्रतिदाव्यातील वादीस प्रत्येकी रु.१००/- (प्रत्येकी रुपये शंभर) खर्च देण्याच्या अटीवर अर्ज (नि.४०) मंजूर.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2026.02.02 16:57:02 +0530

श्रीगोंदा.
दिनांक ०२/०२/२०२६.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.